ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal

# तिफण

वर्ष १२ वे अंक १ ला
एप्रिल, मे, जून २०२१



## महामानव
## डॉ. बाबासाहेब आंबेडकर
## अभिवादन विशेषांक

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

वर्ष १२ वे, अंक - पहिला एप्रिल ते जून २०२१

**UGC Care Listed Journal**
**ISSN 2231 - 573X**

(भाग—०१)

• संपादक •

**डॉ. शिवाजी हुसे**

**पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड, कन्नड, जि. औरंगाबाद - ४३११०३, मो. ९४०४०००३९८.**



# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेती व शेतकरी धोरण

**प्रा.बालाजी रावसाहेब बोडके**

भारतीय घटनेचे शिल्पकार, दलितांचे कैवारी, प्रज्ञासुर्य, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अलौकिक प्रतिभावंत म्हणुन जगविख्यात आहेत. आधुनिक भारताच्या इतिहासात स्वातंर्त्यपूर्व व स्वातंर्त्योत्तर कालखंड हा ज्या ज्या व्यक्ती मुळे विशेष स्मरणात राहील अशा व्यक्ती मध्ये डॉ. बाबासाहेब यांचे नाव अग्रक्रमाणे घ्यावे लागेल. माणूस हा जन्माने मोठा होत नसतो तर तो त्याच्या कर्तृत्वाने मोठा होत असतो. तसेच माणूस किती काळ जगला यापेक्षा तो कसा जगला याला महत्व असते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे या दोन्ही अर्थाने महामानव आहेत. त्यांचे विचार व कार्य महान आहे.

विसाव्या शतकातले असामान्य, अतुलनीय, बुद्धीजीवी व्यक्तिमत्व म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होय. ज्यांनी जग आकलनाच दूरदर्शीपणा बुध्दीच्या सामर्थ्यावर मिळविला होता. सुप्रसिद्ध मार्क्सवादी अर्थशास्त्रज्ञ पाल बरण यांनी हुशार आणि बुध्दिजीवीमध्ये फरक केला आहे. आणि तो फरक म्हणजे हुशार माणसे त्यांची हुशारी स्वतःकरिता, स्वतःच्या भल्याकरिता उपयोगात आणतात तर बुध्दिजीवी आपल्या बुध्दीच्या सामर्थ्यावर परिस्थितीचे सुयोग्य विश्लेषण करून समाज बदल घडवून आणतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पाल बरणच्या व्याखेप्रमाणे सर्वोत्तम बुध्दिजीवीमध्ये मोडतात. ॲन्टिनीओ ग्राम्सी म्हणतात की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मूलतः बुध्दिजीवी व्यक्तीमत्वाचे एक असामान्य उदाहरण होय. त्यांच्या व्यक्तीमत्वाचा प्रत्येक पैलु जोपासणारा आहे. त्यातीलच एक पैलू म्हणजे शेती व शेतकरी धोरण आहे.

संशोधनाची गृहितकेः–

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेतीविषयक धोरण राष्ट्रव्यापी होते.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेतीसाठी पायाभूत सुविधांचा जोड दिली.

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धोरण हे शेतक–यांना स्वावलंबी बनवण्याचे होते.

संशोधनाची उद्दिष्टेः–

१) डॉ. बाबासाहेबांच्या शेतीच्या राष्ट्रीयीकरणाचा विचार स्पष्ट करणे.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेतीसाठी उपलब्ध केलेल्या पायाभूत सुविधांचा अभ्यास करणे

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शेतीविषयक धोरणाचा आढावा घेणे.

प्रस्तुत शोधनिबंधासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला असून प्रस्तुत शोधनिबंधासाठी प्राथमिक व दुय्यम साधनाचा उपयोग केला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९१८ मध्ये द जर्नल ऑफ इंडियन इकॉनॉमिक सोसायटी च्या अंकामध्ये स्मॉल होल्डीग्ज इन इंडिया ॲन्ड देअर रेमिडीज हा लेख लिहिला. या लेखामध्ये त्यांनी असे सांगितले की, शेती हा भारताचा एक सर्वात मोठा राष्ट्रीय उद्योग आहे. सर्व प्राथमिक व्यवसायामध्ये शेतीचे महत्व अधिक आहे. भारतीय शेतीच्या उत्पादकतेवर परिणाम करणा—या घटकात १) भारतीय शेतीचा आकार. २) शेतजमिनीवरील उत्पादन घटकाचे प्रमाण ३) जमिनीची खाजगी मालकी. इत्यादी घटक सांगितले. हे सांगताना म्हणाले की, शेतीच्या उत्पादकतेवर प्रतिकुल परिणाम करणारा घटक जर कोणता असेल तर तो शेतजमिनीचे तुकडीकरण होय. तुकडीकरणामुळे शेतीचा आकार लहान झाला,शेतीची उत्पादकता कमी झाली.ती उत्पादकता वाढविण्यासाठी पुढील उपाय सांगितले.

१) विखुरलेल्या जमिनीचे एकत्रीकरण करून तीचा आकार वाढवून ती किफायतशिर करणे. २) शेतीला आकार आर्थिक स्वरुपाचा असणे. ३) शेतीची मशागत आधुनिक बी—बियाणे, किटकनाशके इत्यादी साधने वापरल्यास शेतीची उत्पादकता निश्चितच वाढेल ४) सामुदायिक शेतीचा पुरस्कार करणे. तसेच ब्रिटिशांनी शेतजमिनीवर भरमसाठ कर आकारल्यामुळे कृषि क्षेत्रावर प्रतिकूल परिणाम झाला असे म्हणाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते जमिनीचे एकत्रीकरण केले म्हणजे जमिनीच्या उत्पादकतेत वाढ करण्याचा प्रश्न सुटेल असे नाही. कारण आज लहान लहान जमिनीचे एकत्रीकरण झाले आणि जमिनीचे क्षेत्रफळ वाढले,परंतु भविष्यात एकत्रीकरण केलेल्या जमिनीचे विभाजन होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. जर काळजी घेतली नाही तर पुन्हा जमिनीचे विभाजन होईल एवढेच नाही तर विखुरीकरणही मोठ्या प्रमाणात होईल.भारतात वारसा हक्काचा कायदा असल्यानेही कायद्याचे उपविभाजन आणि विखुरीकरणास जबाबदार ठरतात. तेव्हा वारसा हक्कामुळे जमिनीच्या धारण क्षेत्राचा आकार बिन किफायतशिर होत असेल तर कायद्यानेच त्याला परवानगी देऊ नये. कायद्यामध्ये सुधारणा करावी असे आंबेडकरांनी शेतीविषयक विचार करताना सुचविले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेतीविषयी विचार मांडताना असे सुचविले की,रशियाच्या धर्तीवर आपल्याला सामुदायिक शेतीची पध्दती स्विकारली पाहिजे. आपल्या शेतीचा प्रश्न सोडविण्याचा तोच एक मार्ग आहे. आंबेडकरांच्या मते सामुहिक शेती पध्दतीचा स्विकार केल्यास उत्पादकता आणि कार्यक्षमता कायम राहुन ग्रामीण अर्थव्यवस्थेचे आर्थिक परिवर्तन करणे शक्य आहे. त्यांच्या मते समाजात अन्याय आणि शोषण सामुदायिक शेतीमध्ये होत नाही. शेतीची प्रगती व्हावी यासाठी बॅंका,पतपेढ्या खरेदीविक्री मंडळे स्थापन करावे त्यामधुन शेतीचा विकास करावा.

१९४४ मध्ये बंगाल सरकारने स्थापन केलेल्या दामोदर नदी पूर चौकशी कमिटीसमोर डॉ. बाबासाहेबांनी भारत सरकारचे मंजुर प्रतिनिधी म्हणून केलेले भाषण शेतक—याच्या हिताचे ठरते.दामोदर नदीच्या पुरामुळे हजारो लोकांचे प्राण गेले व नुकसान झाले. त्यांच्या मते त्या पाण्याचा उपयोग शेती, विद्युतीकरण आणि वाहतुकीसाठी करण्यात यावा म्हणून त्या प्रकल्पास मान्यता मिळविण्याची शिफारस केली. कृषिप्रधान देशात पाणी आणि विद्युत याचा पुरवठा समतोल असेल तर ग्रामीण भारत हा संपन्न होईल. शिफारस करताना कोणत्याही राज्यावर अन्याय होणार नाही याची दक्षता घेतली गेली व सर्वांना समान हक्काचा सल्ला देणारे डॉ. आंबेडकर हे राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतिक होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १७ सप्टेंबर १९३७ रोजी मुंबई कायदेमंडळात खोती पद्धत रद्द करण्याविषयी विधेयक मांडले. खोती ही रत्नागिरी, ठाणे, कुलाबा जिल्ह्याच्या काही भागात प्रचलित होती.

खोत मात्र त्यांच्या स्वातंर्त्याचा सर्रास दुरूपयोग करित असत. ते भुधारकावर जुलूम करत असत त्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती बिकट बनली. त्यामुळे हि पद्धत नष्ट करण्यात यावी यासाठी भुदास व खोत यांच्यात वाद विकोपाला गेला. भुदासांनी तीन खोतांना ठार मारले. बाबासाहेबांनी ही पध्दत नष्ट करण्याची मागणी केली. आंबेडकरांचे खोती अंताचे विधेयक म्हणजे स्वतंर्त्योत्तरकाळात देशात करण्यात आलेल्या जमिन सुधारणा विषयी कायद्याची नोंद होय.

शेती व औद्योगिकरणासाठी पाणी व विज महत्वाची असून त्यांचा जर पुरवठा समतोल असेल तर शेती व शेतकरी संपन्न होईल पर्यायाने देश समृध्द होईल. आज जे पाण्याचे भिषण संकट देशासमोर आहे त्यासाठी त्यांनी उत्तर भारतातील बारमाही नदी व बर्फाची होत असलेली वृष्टी आणि त्यामुळे असलेला जलसाठा जर दक्षिण भारताकडे वळविला तर देश सुजलाम व सुफलाम बनेल. त्यासाठी त्यांनी नदीजोड प्रकल्प सुचविले, ती रालोआच्या काळात पंतप्रधान अट्टलबिहारी वाजपेयी यांनी पुनर्रुच्चार केला. नव्याने नदीजोड प्रकल्पाची संकल्पना मांडली जी मुळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुचविलेली होती.

जमीन महसूल हा खंड आहे की, कर याबाबतीत वाद होता. याबाबतीतही आंबेडकरांनी आपले मत मांडलेले आहे. केसरी या दैनिक पत्राने २८ जुलै १९२५ च्या अंकात संपादकीय लेख लिहून जमिन महसूल शेतीच्या उत्पनावर आकारावा असे प्रतिपादन केले होते. डॉ. आंबेडकरांनी या लेखाला प्रत्युत्तर म्हणून १८ ऑगस्ट १९२५ रोजी लेख लिहून या मुख्य विधानालाच विरोध केला. उत्पनावर जमिन महसूल आकारणे अन्यायाचे असल्याचे त्यांनी सांगितले. जमिन महसूल हा कर भरण्याच्या पात्रतेवर अवलंबून नसते. कर भरण्याची पात्रता ही उत्पनात वाढ झाली की, वाढत असते. अशा परिस्थितीत विद्यमान कर आकारणी ही अन्याय असुन सर्वांपासून सारखा कर वसूल करणे न्यायाचे नसते. काही विशिष्ट रक्कमेपेक्षा कमी उत्पन्न असणा–यांना जमिन महसुलाची माफी मिळाली पाहिजे. जमिन महसुलाच्या बाबतीत गरिब व श्रीमंत यांना सारखाच कर भरावा लागतो म्हणुन जमिन महसूल संहितेचे १०७ वे कलम रद्द करुन जमिन महसूल प्राप्तीकराच्या कक्षेत आणला पाहिजे असे त्यांनी प्रतिपादन केले होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे १९४२ ते १९४६ या काळात भारताचे मजुरमंत्री होते. याच काळात त्यांच्याकडे बांधकाम, पाटबंधारे, ऊर्जा या महत्त्वाच्या खात्याचा कारभारही देण्यात आला. पाटबंधारे मंत्री म्हणून बाबासाहेबांनी शेतीला आवश्यक असणा–या जलविकासाचा पाया घातला. दामोदर प्रकल्प, महानदी प्रकल्प हिराकुड प्रकल्प, सोननदी प्रकल्प, तसेच पंजाबमधील छोटी छोटी धरणे, तुंगभद्रा धरण, चंबळ नदी प्रकल्प, असे धाडसी निर्णय घेतले व ते पुर्ण केले. त्यांनीच कोसी नदीवरील प्रकल्पाचे संपूर्ण नियोजन केले परंतु ते कार्यन्वित झाले नाही त्याचे परिणाम आपण आज भोगतो आहोत.

डॉ. आंबेडकरांच्या मते, औद्योगिकरणामुळे देशाचा विकास जलदगतीने होतो. हे इंग्लंड, अमेरिका, जर्मनीच्या वास्तव्यात प्रत्यक्ष पाहिले होते. शेतीबरोबरच औद्योगिक विकास आवश्यक आहे असे त्यांचे मत होते. शेतातील आर्थिक विषमता व दिवसेंदिवस बदलणा–या निसर्गावर अवलंबून राहुन शेती करणे शक्य नाही. यासाठी जोडव्यवसाय असावा अशी भुमिका त्यांनी मांडली. स्वातंर्त्योत्तर काळात राज्य केवळ शेतीप्रधान राहू नये तर ते उद्योगप्रधान व्हावे. शेतीवरील लोकसंख्या भार कमी करण्यासाठी शेतीवर आधारित उद्योग वाढवावे अशी भूमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घेतली होती.

भारतात वाढणारी लोकसंख्या व शेतीचे तुकडीकरण यामुळे शेतीपुरक व्यवसायाला संधी द्यावी. आपला शेतकरी हा फक्त शेतकरी न राहता तो व्यापारी कारखानदार व्हावा यासाठी उद्योगातुन निष्क्रिय कामगाराला रोजगाराचे साधन मिळेल. ग्रामीण भागातून येणारे बेरोजगाराचे लोंढे कमी होतील व छुपी बेकारी कमी होऊन आर्थिक शोषण टळेल असा आशावाद बाबासाहेबांचा होता.त्याचबरोबर निष्क्रिय श्रम व भांडवलाला जिवंत राहण्यासाठी उपभोग खर्च करावा लागतो त्यामुळे कोणताही परिस्थितीत हे

निष्क्रिय श्रम देशाला परवडणारे नाहीत मात्र काही जे राष्ट्रीय उत्पन्न उपलब्ध असते त्याचाच भाग त्याच्या उपभोगासाठी खर्च केला जातो व याचा आर्थिक विकासावर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे भारतातील निष्क्रिय श्रमाचा प्रश्न सोडविण्यासाठी औद्योगिककरण हाच पर्याय आहे हा उपाय सुचवला. वाढते. औद्योगिककरणामुळे कृषि क्षेत्रातील अतिरिक्त श्रमाचा भार हा उद्योगाकडे स्थानांतरीत केल्यास त्याचा उत्पादक कार्यासाठी वापर होईल. राष्ट्रीय उत्पन्न वाढुन लोकसंख्येचे शेतीवरील अवलंबित्व कमी झाल्यामुळे विभाजन व अपखंडन समस्या दूर होईल. असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्पष्ट करतात.

निष्कर्षः— १) जमिनीच्या तुकड्यामुळे उत्पादन कमी होते त्यामुळे सामुदायिक शेती केली पाहिजे. २) शेतीला शेतीपुरक व्यवसायाची जोड दिली पाहिजे. ३) शेतमालावर प्रक्रिया करणारे उद्योग विकसित झाले पाहिजे. ४) शेतीसाठी खरेदी विक्री मंडळे, बॅका स्थापन कराव्यात. ५) राजसत्तेचा उपयोग शेतक—यांच्या हितासाठी करावा. ६) शेतीला पायाभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

डॉ. बाबासाहेबांच्या शेती व शेतकरी धोरणाचा अभ्यास केल्यानंतर वरील निष्कर्ष आपल्या हाती येतात. त्यांनी शेतीचे व्यापकत्व सांगितले. राष्ट्राचे हित लक्षात घेऊन व शेतक—यांच्या समस्यांचा अभ्यास करून आपले धोरण निश्चिंत केले होते. हे वरील निष्कर्षातुन स्पष्ट होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वाढणा—या लोकसंख्येची जाण होती. वाढत्या लोकसंख्येबरोबर जमिनीचे तुकडे वाढतील त्यामुळे ती अनार्थिक स्वरुपाची होईल. ते आज आपणाला घडताना दिसत आहे. शेतीच्या आकारमानाविषयी व उत्पादकतेविषयी मांडलेले विचार आज वास्तवात दिसत आहे.

समारोपः— डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शेती व शेतकरी धोरणाचा अभ्यास करित असताना आजही शेतीची अवस्था अत्यंत सुधारलेली नाही. त्याला कारण बाबासाहेबांनी सांगितल्याप्रमाणे तुकडीकरण आहे. पर्यावरण असंतुलन, पाण्याचा अभाव, सहकाराचा अभाव त्यामुळे शेतीत दैन्यावस्था निर्माण झाली. त्यासाठी बाबासाहेबांनी सुचविलेले उपाय अंगिकारले पाहिजे. आज शेतक—याच्या आत्महत्या वाढत आहेत. शेतीसाठी पाण्याचे नियोजन नाही. डॉ. बाबासाहेबांच्या जलनितीचा अवलंब केला असता तर शेतीला पाणी मिळाले असते. सहकारी तत्वाने उत्पन्न वाढले असते त्यासाठी भारत कृषिप्रधान बनण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कृषि विचाराची गरज आजच्या शेतकरी वर्गासाठी अत्यंत मोलाची आहे.

संदर्भ ग्रंथः—


१) खैरमोडे वा.भ.,बाबासाहेब आंबेडकर, चरित्र खंड—१

२) गांजरे मा.फ.,बाबासाहेबांची भाषणे

३) हजारे त्रिलोक,डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृषिविषयक विचार, लोकराज्य मासिक, अंक आठवा

४) पंडित नलिनी, आंबेडकर, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, २००५.

५) चित्रे श.आ.,वेगळ्या वाटेचे प्रवाशी, अक्षर प्रकाशन, पुणे, १९९४.

६) कीर धनंजय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९९९.

७) लुलेकर प्रल्हाद, अनंत पैलुचा सामाजिक योध्दा, सायन्स प्रकाशन, पुणे, २०१.



**सुंदरराव सोळंके महाविद्यालय,**

**माजलगाव, ता.माजलगाव.जि.बीड.**

**मो.नं.965767824**

**balajibodke77@gmail-com -**